


दिलीप - सायराः एका वादळाचा अपवाद वगळता सुखी दाम्पत्य

फिल्मी कलाकारांचे प्रेमसंबंध, लग्न, मुलंबाळं याबद्दल त्यांच्या चाहत्यांना नेहमीच कुतूहल वाटत आलंय. अनेकदा या वैवाहिक जीवनात वादळं येतात, भांड्याला भांडं लागतं, त्याचीही चर्चा होते. तर काही स्टार्स आयुष्यभर सुखासमाधानाने जीवन व्यतित करतात...

झगमगत्या स्टार्सच्या वैवाहिक जीवनावर प्रकाशझोत



जया - अमिताभः विवाहपूर्वीचा साजशृंगार

नायक आणि नायिकेच्या प्रेमाची परिणती विवाहात होताना अनेकदा पडद्यावर नाट्यात्मक पद्धतीने सादर केलं जातं. त्यातला निर्मात्याचा व्यावसायिक हेतू एकवेळ समजू शकतो, पण अनेक कलाकारांच्या खाजगी जीवनातही असंच नाट्य घडतं. कितीतरी कलाकारांनी चित्रपटातल्या कथेला शोभेल अशा रितीने वैवाहिक जीवनात प्रवेश केलाय. १९५४मध्ये *टॅक्सी ड्रायव्हरच्या* सेटवर देव आनंदने आपली नायिका कल्पना कार्तिक हिला लग्नाची मागणी घातली. तिनेही क्षणाचा विचार न करता होकार दिला आणि त्याच दिवशी लंच ब्रेकमध्ये दोघांनी लग्नही केलं.

शम्मी कपूर आणि गीताबालीच्या लग्नाचा किस्साही गमतीचा आहे. घरातल्या वडीलधाऱ्यांचा विरोध होईल या भीतीने दोघांनी मध्यरात्री मुंबईतल्या बाणगंगा येथील एका देवळात गुपचुप लग्न करून घेतलं.

मदर इंडियाच्या सेटवर लागलेल्या भीषण आगीतून सुनील दत्तने एखाद्या फिल्मी हीरो स्टाईलने नरगीसला वाचवलं आणि तिच्यापुढे लग्नाचा प्रस्ताव मांडला. नरगीसनेही होकार दिला आणि चित्रपट प्रदर्शित होण्याआधीच पडद्यावरचे हे माता-पुत्र प्रत्यक्ष जीवनात पती-पत्नी झाले. मात्र हे बिंग बाहेर पडलं तर त्याचा चित्रपटाच्या व्यवसायावर परिणाम होईल याची जाणीव असल्याने ही गोष्ट त्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनापर्यंत गुप्त ठेवली होती.


इथे एक गोष्ट सहज आठवली. *मदर इंडियामधल्या* बिरजूची भूमिका अगोदर दिलीपकुमारला ऑफर करण्यात आली होती. पण अगोदर ही जोडी रोमँटिक नायक-नायिका म्हणून पडद्यावर हिट ठरल्याकारणाने दर्शक आई-मुलाच्या रोलमध्ये त्यांना स्वीकारतील की नाही अशी भीती निर्मात्याला वाटली. त्यामुळे दिलीपऐवजी सुनील दत्तला तो रोल देण्यात आला. कल्पना करा, दिलीपकुमारने तो रोल साकारला असता तर पुढचं हे नाटक घडलं असतं? संजय दत्तचा जन्म झाला असता? असो, पडद्यावर राज-नरगीसची जोडी अमर झाली तशीच सुनील-नरगीसची जोडी आदर्श दाम्पत्य म्हणून इंडस्ट्रीत अमर झाली.

अनेकदा चित्रपट कलाकारांच्या प्रेम संबंधांचा शेवट विवाहाऐवजी घटस्फोटात होतो. राज-नरगीसचं उदाहरण घ्या ना. *एक छोटीसी लव्हस्टोरीच्या* विवादानंतर मनीषा कोईरालाने बाळ ठाकरेंकडे धाव घेतली होती. मात्र राज-नरगीसच्या प्रकरणात राजला लग्नासाठी राजी करावं म्हणून नरगीसने तत्कालीन भारतीय पंतप्रधान मोरारजी देसाई यांना गळ घातली होती असं म्हणतात. पण परंपरावादी मोरारजींनी नरगीसला हे लग्न होण्यासाठी आपण शब्द टाकणार नाही अशी स्पष्ट कल्पना दिली होती.


तसे दिलीपकुमार आणि मधुबाला यांच्यातही प्रेमसंबंध होते. पण मधुबालाचे वडील अताऊल्ला खान यांना आपल्या मुलीने एका पठाणाशी लग्न करणं मान्य नव्हतं. अखेरीस या पठाणविरोधी पित्याची मुलगी बंगाली हिंदू किशोरकुमारबरोबर लग्न करून मोकळी झाली आणि दिलीपकुमारने वयाच्या ४४व्या वर्षी आपल्यापेक्षा अर्ध्या वयाच्या(२२ वर्षांच्या) सायराबरोबर निकाह लावला.

अर्थात, त्यानंतरही त्यांचं वैवाहिक जीवन म्हणावं तसं सुरळीत नव्हतं. दिलीपच्या जीवनात अस्मा आली. दिलीपने तिच्याशी सायराच्या अपरोक्ष लग्नही केलं होतं. ही गोष्ट कळल्यावर सायराने असं काही आकांडतांडव केलं की दिलीपला तिच्यासमोर हार पत्करावी लागली आणि अस्मा त्याच्या आयुष्यातून कायमसाठी गेली.

दिलीप-अस्माच्या लग्नाच्या बातमीने सर्वाधिक आनंद कोणाला झाला असेल तर तो रेखाला. तिच्यावर लिहिलेल्या एका पुस्तकात लेखकाने स्पष्ट म्हटलंय की दिलीपकुमार-अस्मा आणि धर्मेंद्र-हेमामालिनी या दोन विवाहांनी इंडस्ट्रीत प्रवाद निर्माण केला होता त्यावेळी रेखा मात्र मनात मांडे खात होती. कदाचित या दोघांप्रमाणेच अमिताभही एक पत्नी असताना दुसरी पत्नी म्हणून तिचा स्वीकार करेल अशी आशा तिला वाटत होती. पण रेखाच्या तळहातावर अमिताभ नावाची रेखा लिहिलेलीच नव्हती.



डिंपल - राजेशला हेमामालिनीसहित उभ्या इंडस्ट्रीने शुभेच्छा दिल्या, पण...



रिमा कपूरच्या विवाहप्रसंगी नीतू-ऋषीच नवरा-नवरीसारखे सजले.



अभिनेत्री म्हणून इंडस्ट्रीत कमी चमकलेल्या आयेशाने जॅकीच्या जीवनात बहार आणली.

गुरू दत्त - गीता दत्तची शोकांतिका

१६ मे १९५३ रोजी विवाहबद्ध झालेल्या गुरू दत्त आणि गीता दत्त यांच्या वैवाहिक जीवनाचा अंत करुण होता. वहिदाच्या प्रेमात वेड्या झालेल्या गुरू दत्तने एका रात्री मद्याबरोबर झोपेच्या गोळ्यांचं अती सेवन केलं. त्यातच त्याचा अंत झाला. तो अपघात होता की आत्महत्या? हे रहस्य अजूनही गुलदस्त्यात आहे.

गुरू दत्तच्या दुःखाविषयी आजवर अनेक ठिकाणी लिहिलं गेलंय. पण गीता दत्तची कहाणी त्याच्यापेक्षाही करुण होती. तिचा नवरा



पुत्र तरुणबरोबर गीता आणि गुरू दत्त

एका नवोदित अभिनेत्रीच्या प्रेमात पडलेला असताना पार्श्वगायिका म्हणून तिची कारकीर्द जवळपास संपुष्टात आली होती. तिची सगळी शक्ती नवऱ्याशी झगडण्यातच जात असे. तर दुसरीकडे गुरू दत्तच्या कळपातून बाहेर पडून दुसऱ्या बॅनर्ससाठी काम करायला वहिदा उत्सुक होती.

त्यावेळी म्हणजे साधारण १९५७मध्ये गुरू दत्तनी आपले वैवाहिक संबंध सुरळीत करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू केले. त्यांनी *गौरी* नावाच्या एका चित्रपटाची घोषणा केली. त्यात नायिका म्हणून वहिदाऐवजी गीताचं नाव जाहीर केलं. चित्रपट सुरू झाला पण काही कारणवश तो पूर्ण होऊ शकला नाही. साधारण त्याच सुमारास संगीतकार एस. डी. बर्मनचं लता मंगेशकरबरोबर बिनसलं. त्यांनी लताला पर्यायी गायिका म्हणून गीता आणि आशा भोसले या दोन नावांचा विचार सुरू केला. गीतासमोर त्यांनी तसा प्रस्तावही ठेवला होता. पण मनाने खचलेल्या गीताला पूर्वीच्या जोमाने गायन जमलं नाही. तिचं लक्ष कामावर केंद्रित होतच नव्हतं. शेवटी बर्मनदांनी तिचा नाद सोडून आशाला संधी दिली. ओ. पी. नय्यर आणि बर्मनदांच्या प्रोत्साहनाने आशा यशाची शिखरं सर करत गेली तर नैराश्यग्रस्त गीता मद्याच्या आहारी जाऊ लागली.

१० ऑक्टोबर १९६४मध्ये गुरु दत्तच्या मृत्यूनंतर गीता पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आणि नर्व्हस ब्रेकडाऊनची शिकार झाली. ज्यावेळी ती सावरली तोपर्यंत बराच उशीर झाला होता. गुरू दत्तची कंपनी आर्थिक अडचणीत सापडली होती. कुठूनही उत्पन्नाचं साधन नव्हतं. गीताने काम शोधायला सुरुवात केली. पण आता इंडस्ट्रीत तिला पूर्वीइतकी मागणी नव्हती. अखेरीस खाजगी अल्बम आणि प्रायव्हेट शोजमधून ती कामं करू लागली. १९६७ मध्ये एका बंगाली चित्रपटात नायिका म्हणून तिला संधी मिळाली पण बॉलीवूडमध्ये यशस्वी अभिनेत्री म्हणून मिरवलेल्या गीताचं मन तिथे रमलं नाही. अपयशाचं कटू सत्य ती दारूच्या घोटाबरोबर रिचवू लागली. आणि १९७२ साली या प्रतिभावंत गायिका-अभिनेत्रीने जगाचा निरोप घेतला. मृत्यूच्या वर्षभर आधीच वासू भट्टाचार्यच्या *अनुभव*मध्ये 'मुझे जां न कहो मेरी जां...', 'कोई चुपके से आके...' आणि 'मेरा दिल जो मेरा दिल होता...' ही गाणी गावून उतारवयातही तिने आपल्या प्रतिभेचा परिचय दिला.

मीनाकुमारीचं विफल वैवाहिक जीवन आणि मद्य सेवन या विषयी बरंच काही लिहिलं गेलं. त्यामानाने गीता दत्तचं आयुष्य उपेक्षित राहिलं. त्याच अयशस्वी विवाह संबंधांनी आणि दारूच्या व्यसनाने गीता दत्तच्या आयुष्याची धूळधाण उडवली.

तरीही, रेखा-अमिताभचे प्रेमसंबंध ऐन बहरात असताना एकदा भांगात सिंदूर भरून आणि गळ्यात मंगळसूत्र परिधान करून रेखा उजळ माथ्याने एका समारंभाला गेली होती. त्या ठिकाणी अमिताभ-जयाही आले होते. प्रसंग होता ऋषी कपूर-नीतू सिंगच्या रिसेप्शनचा. झालं, फोटोग्राफर्स नवरा-नवरीला सोडून सौभाग्यालंकार परिधान केलेल्या रेखाचे फोटो काढायला आधी धावले. त्या दिवशी अमिताभने मात्र संयम राखला आणि रेखाच्या उथळ वागण्याकडे दुर्लक्ष केलं.

पुढे ऋषी-नीतूचं लग्नजीवनही बरंच गाजलं. *बॉबी*सारख्या सुपरहिट चित्रपटाचा हीरो म्हणून लोकप्रिय ठरलेला ऋषी कपूर नंतर डिंपलबरोबर *सागर* वगळता फारसा लक्षात राहिला नाही. मात्र नीतू सिंगबरोबर तो अनेक चित्रपटात चमकला. त्यांची जोडी रोमँटिक हिट जोडी म्हणून नावारूपाला आली. दरम्यान त्यांच्यातील प्रेमसंबंधही वाढीस लागले. १९८०मध्ये त्या दोघांनी लग्न केलं. लौकिक अर्थाने त्यांचं वैवाहिक जीवन सुखा-समाधानाचं होतं. मात्र काही वर्षांपूर्वी नीतूने ऋषी कपूरकडून होणाऱ्या मानसिक छळाविरुद्ध न्यायालयात दाद मागितली होती. पुढे ते प्रकरण तेवढ्यावरच थांबलं आणि आता दोघं पुन्हा एकदा आदर्श दाम्पत्य म्हणवून घेताहेत.

रेखा प्रकरणानंतर अमिताभ-जयामध्येही थोडासा बेबनाव निर्माण झाला होता. पण जयाने अतिशय संयमाने सगळं प्रकरण हाताळलं आणि सुखी, आदर्श जोडपं म्हणून समाजात पूर्वीचाच सन्मान प्राप्त करण्यात दोघंही यशस्वी झाली.

त्यांच्या लग्नातही मोठं नाट्य होतंच. दोघं प्रेमात पडली त्यावेळी जया *गुड्डी*मुळे प्रथितयश अभिनेत्री म्हणून नावारूपाला आली होती. अमिताभ मात्र त्यामानाने नवोदित होता. त्याचा संघर्ष चालू होता. तरीही जयाने त्याच्याशी लग्नाचा निर्णय घेतला. अमिताभ-जयाचं प्रेमप्रकरण चालू असताना दोघांनी काही काळासाठी लंडनला जायचा विचार केला होता. मात्र अमिताभच्या आई तेजी यांनी त्यांना असं लग्न न करता एकत्र राहायला


नकार दिला. दोघांना एकमेकांच्या संगतीत राहावंसं वाटत असेल तर लग्न करा आणि खुशाल कुठेही जा अशी सक्त आज्ञा त्यांनी अमिताभला दिली आणि अमिताभनेही ती शिरसावंद्य मानून जयाशी रितसर लग्न केलं. लग्नानंतर जयाने स्वखुशीने चित्रपटातून अंग काढून घेतलं. श्वेतांबरी(श्वेता) आणि अभिषेकच्या जन्मानंतर तर जया पूर्णपणे गृहिणीच झाली. प्रदीर्घ विरामानंतर तिने अमिताभबरोबर एका चित्रपटात काम केलं होतं..त्याची चर्चाही बरीच झाली. कारण त्यात अमिताभ-जया पती-पत्नी होते तर अमिताभ-रेखा प्रियकर-प्रेयसी. लोकांना या चित्रपटाच्या प्रदर्शनाआधीच त्याच्याविषयी कमालीची उत्सुकता वाटत होती. त्या चित्रपटाचं नाव होतं *सिलसिला*. त्यानंतर अमिताभ-रेखाच्या प्रेमाचा सिलसिला संपला.

इंडस्ट्रीत अशा प्रेमकथांना काही अंतच नाही. धर्मेंद्रशी लग्न करण्याआधी हेमा मालिनीलाही संजीवकुमार आणि जितेंद्रने लग्नाची विचारणा केली होती म्हणे. अनुपमा चोप्राने *शोले*विषयी लिहिलेल्या एका पुस्तकात लिहिलंय की, *शोले*मधली ठाकूरची भूमिका करण्याची धर्मेंद्रची तीव्र इच्छा होती. तसा त्याने दिग्दर्शक रमेश सिप्पींकडे आग्रहही धरला होता. पण तसं केलं तर वीरूची भूमिका संजीवकुमारला द्यावी लागेल आणि क्लायमॅक्सला संजीवकुमार-हेमामालिनीचं लग्न झालेलं दाखवावं लागेल याची कल्पना रमेशजींनी त्याला दिली. झालं, ही मात्रा बरोबर लागू पडली. धर्मेंद्र लगेच वीरूची भूमिका साकारायला तयार झाला, असं खुद्द अनुपमा वर्मांनी आपल्या पुस्तकात म्हटलंय.


इंडस्ट्री आणि सिनेप्रेमिकांच्या मनात कुतूहल निर्माण करणारी अशी कितीतरी लग्न सांगता येतील. मिथुन चक्रवर्तीबरोबर योगिता बालीने लग्नाचा निर्णय घेतला तेव्हा इंडस्ट्रीत एकच चर्चा सुरू झाली. किशोरकुमारच्या या घटस्फोटीत पत्नीला मिथुनबरोबर जमवून घेतानाही बराच त्रास झाला. अनेक संघर्षांचा सामना करत दोघं आता सुखी जोडपं म्हणून ओळखले जातायत.

मोठे स्टार्स नवोदित अभिनेत्रींबरोबर लग्न करतात तेव्हा तोही चर्चेचा विषय बनतो. उदाहरणार्थ, संजय दत्तने रिचा शर्मा नावाच्या नवख्या अभिनेत्रीशी विवाहबद्ध होण्याचा निर्णय घेतला तर जॅकी श्रॉफ अवघ्या एकाच चित्रपटातून चमकलेल्या आयेशाबरोबर चतुर्भुज होऊन मोकळा झाला. नूतन पुत्र मोहनीशनेही एकता शर्मा या मोजक्याच चित्रपटातून दिसलेल्या अभिनेत्रीबरोबर लग्न केलं आणि आजही त्यांचा संसार सुखाने चालू आहे. नबाब पतौडी-शर्मिला यांच्या लाडक्या लेकाने „ चित्रपटातून जवळजवळ बाहेर पडलेल्या आपल्यापेक्षा मोठ्या वयाच्या अमृता सिंगबरोबर लग्नाचा निर्णय घेतला तेव्हाही इंडस्ट्रीने तोंडात बोटं घातली.

इंडस्ट्रीतील सर्वात वादग्रस्त लग्न म्हणावं लागेल ते राजेश खन्ना-डिंपलचं. त्यावेळी राजेश खन्ना सुपरस्टार होता. अंजू महेंद्रूबरोबर त्याचे संबंध जगजाहीर होते. अनेक युवती राजेश खन्नावर मरत होत्या. त्यावेळी अंजूला बाजूला सारून अचानक राजेशने डिंपलबरोबर लग्नाची घोषणा केली. ते संबंधही फार काळ टिकले नाहीत. नऊ वर्षांच्या सहवासानंतर दोघांनी वेगळं होण्याचा निर्णय घेतला.



नवोदित एकता शर्माचा यशस्वी अभिनेता पती मोहनीश



पतौडी - शर्मिला पुत्र सैफने मोठ्या वयाच्या अमृताबरोबर लग्न करून इंडस्ट्रीला बुचकळ्यात टाकलं.

आता त्यांची मुलगी ट्विंकल आणि अक्षयकुमार आदर्श पती-पत्नी म्हणून सुखासमाधानाने राहात असले तरी जाणकारांच्या मते हे संबंधही फार काळ तग धरू शकणार नाही. अगोदर पूजा बत्राच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या अक्षयने नंतर रवीनाबरोबर लग्नाचा निर्णय घेतला होता. मागाहून शिल्पा शेट्टीबरोबर त्याचे संबंध चर्चेत होते. असा भ्रमर वृत्तीचा माणूस एकाच स्त्रीबरोबर आयुष्यभर निभावू शकेल?

अर्थात, हितचिंतक या नात्याने त्यांचं वैवाहिक जीवन अखेरपर्यंत सुरळीत राहावं अशी आपण आशा करू शकतो. तीच बाब करिश्मा आणि अभिषेक यांच्या तुटलेल्या नातेसंबंधांबद्दल म्हणता येईल. सध्या त्यांच्यात दिलजमाई घडवून आणण्यासाठी करिना आकाशपाताळ एक करतेय. त्यात कितपत यश येईल कुणास ठाऊक. आमीर-रीनानेही घटस्फोटाची कागदपत्रं टरकावून नव्याने सहजीवनाला सुरुवात करावी, असं त्याच्या अनेक चाहत्यांना वाटतंय.

विवेक ओबेरॉयबद्दल काय म्हणायचं? पूर्वीची प्रेयसी गुरप्रीत हिच्याबरोबर त्याने मोडलेलं लग्न करावं? की ॲशला जीवनसंगीनी म्हणून निवडावं? कदाचित या दोघींना वगळून एखादी तिसरीच स्त्री त्याच्या आयुष्यात येईल?

हे प्रश्न फार गुंतागुंतीचे आहेत. त्यामुळे फार खोलात न शिरणंच शहाणपणाचं.

□ संकलन